**RNI No. MAHBIL /2009/31745**
**Reg. No. MCS/175/2016-18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

**वर्ष २, अंक ३२]** **सोमवार, जुलै ११, २०१६/आषाढ २०, शके १९३८** **[पृष्ठे ४, किंमत : रुपये ४.००**

**असाधारण क्रमांक ३९**

## प्राधिकृत प्रकाशन

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जुलै २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६.**

क्रमांक पीएमआरडी. ३३१६/प्र. क्र. ५४/नवि-७.— ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-त मधील खंड-ग आणि महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९९ (१९९९ चा महा. ५) चे कलम २(ग) मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने नगरविकास विभाग, क्र. टीपीएस. १८९९/११९१/प्र.क्र. ८०/९९/नवि-१३, दिनांक २३ जुलै १९९९ ची अधिसूचना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) अन्वये पुणे शहराभोवतालचे काही क्षेत्र, विशेष करून उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे क्षेत्र भारतीय संविधानाच्या भाग ९-अ च्या प्रयोजनार्थ " पुणे महानगर प्रदेश " म्हणून घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१ मार्च २०१५ ची अधिसूचना क्र. टीपीएस. १८१५/१२०४/१३/प्र. क्र. ८७/१५/नवि-१३ (यापुढे जिचा उल्लेख " महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाखालील उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) (यापुढे जिचा उल्लेख " उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम " असा करण्यात आला आहे.) चे मधील कलम ४२क, ४२ग व ४२च अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून पुणे महानगर क्षेत्रास, " पुणे महानगर विकास क्षेत्र " म्हणून उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम चे मधील कलम ४२क नुसार घोषित करून कलम ४२ग नुसार या घोषित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण गठित केले आहे (यापुढे जिचा उल्लेख " उक्त प्रदेश विकास प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक ४ डिसेंबर २०१५ ची अधिसूचना क्र. टीपीएस. १८१५/६१३/प्र. क्र. ३०९/१५/नवि-१३ अन्वये इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची हद्द वाढवून सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०१६ ची अधिसूचना क्र. टीपीएस. १८१५/६१३/प्र. क्र. ३१३/१५/नवि-१३, अन्वये इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची आणखी हद्द वाढवून सुधारित हद्दवाढ घोषित केली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास क्षेत्र " असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ (२००० चा महा. ५) च्या कलम २ च्या खंड (क) अन्वये महानगर क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या विवक्षित क्षेत्रांच्या उचित, सुव्यवस्थित व शीघ्र विकासाचे समन्वयन व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासाच्या योजना, प्रकल्प व परियोजना यांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा प्रदेशातील क्षेत्राकरिता प्राधिकरणे स्थापन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ (२०१६ चा महा. अध्या. ११) (यापुढे निर्देश "उक्त अध्यादेश" असा करण्यात आला आहे). दिनांक १३ जून २०१६ रोजी प्रख्यापित केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाच्या कलम ३ चे उप कलम (१) नुसार प्राधिकरण स्थापन होईपर्यंत उक्त विकास क्षेत्रासाठी स्थापन केलेले उक्त विकास प्राधिकरणास उक्त अध्यादेशाच्या कलम ४ चे उप कलम (३) मध्ये त्यांची कार्ये व कर्तव्ये पुढे चालू ठेवण्याची तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाखाली उक्त अधिसूचना विखंडित करून उक्त अध्यादेशाच्या कलम ३ चे उप कलम (१) नुसार महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तातडीने स्थापन करण्याची बाब शासनाने विचाराधीन आहे.

आता, म्हणून महाराष्ट्र शासन महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा महा. अध्या. ११) चे कलम ३ चे उप कलम (१) आणि उक्त महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४२क, ४२ग व ४२च अन्वये यासंदर्भात प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून या अधिसूचनेद्वारे, —

(क) पुणे महानगर प्रदेशासाठी, विशेष करून सदर अधिसूचने सोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्राकरिता, मा. भारताचे राष्ट्रपती महोदयांनी वेळोवेळी घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र वगळून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करीत आहे.

(ख) ज्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४२क खाली पुणे महानगर क्षेत्रास, “ पुणे महानगर विकास क्षेत्र ” म्हणून घोषित करून कलम ४२ग नुसार या घोषित क्षेत्रासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण गठित केले आहे तो दिनांक ३१ मार्च २०१५ ची अधिसूचना क्र. टीपीएस.१८१५/१२०४/१३/प्र.क्र. ८७/१५/नवि-१३ आणि ज्या अधिसूचनेद्वारे इतर बाबींसह पुणे महानगर विकास क्षेत्राची हद्दवाढ घोषित केली आहे ती दिनांक ४ डिसेंबर २०१५ ची अधिसूचना क्र. टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र. ३०९/१५/नवि-१३ आणि दिनांक १० फेब्रुवारी २०१६ ची अधिसूचना क्र. टीपीएस.१८१५/६१३/प्र.क्र. ३१३/१५/नवि-१३ विखंडित करीत आहे.

## अनुसूची

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची चतु:सिमा दर्शविणारी अनुसूची

**पूर्व.**— शिरुर तालुक्यातील तरडोबाचीवाडी, गोळेगाव, चव्हाणवाडी निमोणे, न्हावरा, खोकडवाडी, आंदळगाव, नागरगाव गावांची पूर्व हद्द ते दौंड तालुक्यातील गणेशरोड, नाणगाव, वरवंड या गावांच्या पूर्व हद्दीपर्यंत.

**दक्षिण.**— दौंड तालुक्यातील बोरी पारधी, वाखरी, भांडगाव, यवत, भरतगाव, ताम्हणवाडी, डाळींब या गावांची दक्षिण हद्द, हवेली तालुक्यातील शिंदवणे गावाची दक्षिण हद्द, पुरंदर तालुक्यातील गुऱ्होळीची पूर्व हद्द. सिंगापूर गावाची पूर्व व दक्षिण हद्द, उदाचीवाडी, कुंभारवळण गावांची दक्षिण हद्द ते पिंपळे गावची पूर्व हद्द, बोऱ्हलेवाडी या गावांची पूर्व हद्द, पाणवडी गावची पूर्व-दक्षिण हद्द, घेरा पुरंदर, भैरववाडी, मिसाळवाडी या गावांची दक्षिण हद्द. कुंभोशी गावची पूर्व व दक्षिण हद्द, भोर तालुक्यातील मोरवाडी, वाघजवाडी, भोंगवली, पांजळवाडी, टपरेवाडी, गुणंद या गावांची पूर्व हद्द, गुणंद, वाठारहिंगे, न्हावी, राजापूर, पांडे, सारोळे, केंजळ, धांगवडी, निगडे, कापूरव्होळ, हरिश्चंद्री, उंबरे, सांगवी खूर्द, निधान, दिडघर, विरवडे, जांभळी, सांगवी बुद्रुक या गावांची दक्षिण हद्द, वेल्हे तालुक्यातील आंबवणे, करंजावणे, अडवली, मार्गासणी, आस्कावाडी, विंजर, मळवली, लासिरगाव, दापोडे या गावांची दक्षिण हद्द, वेल्हे तालुक्यातील दापोडे गावची पश्चिम हद्द ते खामगाव गावची दक्षिण हद्द ते रुळे, कडवे, वडघर, आंबेगाव बुद्रुक, दिवशी, शिरकोळी, थानगाव, पोळे, माणगाव या गावांची दक्षिण हद्द, माणगाव आणि कशेडी या गावांची पश्चिम हद्द, मुळशी तालुक्यातील ताव व गडले गावची दक्षिण हद्दीपर्यंत.

**पश्चिम.**— मुळशी तालुक्यातील धामणओहोळ, ताम्हीणी बुद्रुक, निवे, पिंपरी, घुटके, एकोले, तैलबैला, सालतर, माजगाव, आंबवणे,पेठ शहापूर, देवघर या गावांची पश्चिम हद्द. मावळ तालुक्यातील आटवण, डोंगरगाव, कुणेनामा, उधेवाडी, जांभवली, कुसूर, खांड, सावले या गावांची पश्चिम हद्द.

**उत्तर.**— मावळ तालुक्यातील मालेगाव बुद्रुक, पिंपरी, माळेगाव खुर्द, कुणे अनसुटे, इंगळून, किवळे, कशाळ, तलाट या गावांची उत्तर हद्द, खेड तालुक्यातील वाहगाव, तोरणे बुद्रुक, हेतरुज, कोहिंदे बुद्रुक, गारगोटवाडी, कडूस या गावांची उत्तर हद्द, चास गावची पश्चिम हद्द ते कमान, मिरजेवाडी गावांची उत्तर हद्द, काळेचीवाडी, अरुदेवाडी, सांडभोरवाडी, गुळाणी, चिंचबायवाडी, जऊळके बुद्रुक, वाफेगाव, गडकवाडी या गावांची उत्तर हद्द, शिरुर तालुक्यातील थापेवाडी, माळवाडी, खैरेनागद, कान्हूर मेसाई, मिडगुळवाडी, मलठण, आमडाबाद, अण्णापूर, शिरुर या गावांची उत्तर हद्द.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीराम यादव,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 11th July 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966 AND MAHARASHTRA METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY ORDINANCE, 2016.

No.PMRDA.3316/CR 54/UD-7.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Urban Development Department, No. TPS-1899/1191/C.R.80/99/UD-13, dated the 23rd July 1999 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by clause (*c*) of the Article 243-P of the Constitution of India read with clause (*c*) of section 2 of the Maharashtra Metropolitan Planning Committees (Constitution and Functions) (Continuance of Provisions) Act, 1999 (Mah. V of 2000), a certain area, in and around the City of Pune, as specifically described in the Schedule appended to the said Notification, declared as the Pune Metropolitan Area for the purposes of Part IX-A of the Constitution of India;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* the Government Notification, Urban Development Department, No.TPS/1204/13/CR 87/15/UD-13, dated the 31st March 2015 (hereinafter referred to as "the said notification under MR and TP Act"), issued in exercise of the powers conferred by sections 42A, 42C and 42F of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred as "the MR and TP Act"), declared the Pune Metropolitan Area as a "Pune Metropolitan Development Area" under section 42A of the MR and TP Act, and under section 42C thereof also constituted the Pune Metropolitan Regional Development Authority as "Pune Metropolitan Regional Development Authority" (hereinafter referred to as "the said Area Development Authority"), and *vide* the Government Notification, Urban Development Department, No. TPS.1815/613/CR 309/15/UD-13, dated the 4th December 2015 and No.TPS.1815/CR 313/15/UD-13, dated the 10th February 2016, *inter alia* revised the limits of the Pune Metropolitan Development Area;

And whereas, the Governor of Maharashtra has promulgated the Maharashtra Metropolitan Region Development Authority Ordinance, 2016 (Mah. Ord. XI of 2016) (hereinafter referred as to "the said Ordinance") on 13th June 2016, to provide for establishment of the Authorities for certain areas declared as Metropolitan Areas under clause (*c*) of section 2 of the Maharashtra Metropolitan Planning Committees (Constitution and Functions) (Continuance of Provisions) Act, 1999 (Mah. V of 2000), for the purposes of co-ordinating and supervising the proper orderly and rapid development of the said area in such regions and of executing plans projects and schemes for such development, and to provides for matters connected therewith or incidental thereto;

And whereas, proviso to sub-section (*3*) of section 4 of the said Ordinance provides that, the said Area Development Authority shall continue to carry out its functions and duties till the Authority is constituted under sub-section (*1*) of section 3 of the said Ordinance;

And whereas, the Government considers it expedient to establish the Metropolitan Region Development Authority under sub-section (*1*) of section 3 of the said Ordinance, for the Pune Metropolitan Region, more specifically described in the Schedule appended hereto and accordingly, to rescind the said notification under MR and TP Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3 of the Maharashtra Metropolitan Region Development Authority Ordinance, 2016 (Mah. Ord. XI of 2016) and section 42A, 42C and 42F of the MR and TP Act and all other powers enabling it in this behalf, , the Government of Maharashtra hereby,—

(*a*) establishes the Metropolitan Region Development Authority to be called "the Pune Metropolitan Region Development Authority" for the Pune Metropolitan Region, more specifically described in the Schedule appended hereto, excluding the areas declared as the Scheduled Areas by the Hon'ble President of India, from time to time;

(*b*) rescinds the Government Notification, Urban Development Department, No. TPS/1204/13/CR 87/15/UD-13, dated the 31st March 2015, by which the Pune Metropolitan Area

has been declared as a Development Area under section 42A of the MR and TP Act and constituted the Pune Metropolitan Region Development Authority as Area Development Authority under section 42C thereof; and the Government Notification, Urban Development Department, No.TPS.1815/613/CR 309/15/UD-13, dated the 4th December 2015 and No. TPS.1815/CR 313/15/UD-13, dated the 10th February 2016; by which *inter alia* the revised limits of the Pune Metropolitan Development Area has been declared.

*Schedule*

**Boundaries of Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA)**

*East.*— Eastern boundary of village Tardobachiwadi, Golegaon, Chavanwadi, Nimone, Nhavara, Khokadwadi, Andalgaon, Nagargaon in Shirur Taluka, Eastern boundary of village Ganesh Road, Nangaon, Varwand in Daund Taluka.

*South.*— Southern boundary of village Bori Pardhi, Wakri, Bhandgaon, Yavat, Bharatgaon, Thamanwadi, Dalimb in Daund Taluka, Southern boundary of village Shindwane in Haveli Taluka, Eastern boundary of village Garoli, Eastern and Southern boundary of village Shingapore in Purandar Taluka, Southern boundary of Udachiwadi, Kumbharvalan to eastern boundary of village Pimple, Borlewadi, Eastern and Southern boundary of village Panavadi, Southern boundary of villages Ghera Purandar, Bhairavwadi and Misalwadi, Eastern and Southern boundary of village Kumbhoshi, Eastern boundary of villages Morewadi, Vagajwadi, Bhongavali, Panjalwadi, Taparewadi, Gunand in Bhor Taluka, Southern boundary of villages Gunand, Watharhinge, Nhavi, Rajapur, Pande, Sarole, Kenjal, Dhangavadi, Nigade, Kapurhol, Harishchandri, Umbre, Sangvi Khurd, Nidhan, Didghar, Viravade, Jambli and Sangvi Budruk in Bhor Taluka, southern boundary of villages Ambavane, Karanjawane, Adavali, Margasne, Askawadi, Vinjar, Malawali, Lasirgaon and Dapode in Velhe Taluka, Western boundary of village Dapode to Southern boundary of village Khamgaon, Southern boundary of villages Rule, Kadave, Wadghar, Ambegaon Bk., Divashi, Shirkoli, Thangaon, Pole and Mangaon villages in Velhe Taluka, Western boundary of villages Mangaon and Kasedi in Velhe Taluka, Southern boundary of villages Tav and Gadle in Mulshi Taluka.

*West.*— Western boundary of village Dhamanohol, Tamhini Bk., Nive, Pimpri, Ghutke, Ekole, Tailbaila, Saltar, Majgaon, Ambavane, Peth Shahapur and Deoghar in Mulshi Taluka, Western boundary of village Aatvan, Dongargaon, Kunenama, Udhewadi, Jambhavali, Kusoor, Khand and Savale in Maval Taluka.

*North.*— Northern boundary of village Malegaon Bk., Pimpri, Malegaon Kh., Kune Ansute, Ingalun, Kivale, Kashal and Talat in Maval Taluka, Northern boundary of village Wahagaon, Tore Bk., Hetruj, Kohinde Bk., Gargotwadi and Kadus in Khed Taluka, Western boundary of Chaas to Northern boundary of village Kaman and Mirjewadi, Northern boundary of village Kalechiwadi, Arundwadi, Sandbhorwadi, Gulani, Chinchbaiwadi, Jaulke Bk.,Wafegaon, Gadakwadi in Khed Taluka, Northern boundary of villages Thapewadi, Malwadi, Khairenagad, Kanhur Mesai, Midgulwadi, Malthan, Amdabad, Annapur and Shirur in Shirur Taluka.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIRAM YADAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.